**तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारित येणा-या महाराष्ट्र राज्यातील सर्व व्यावसायिक अभ्यासक्रमाच्या पदवी, पदविका विद्यार्थ्यांसाठी अमर्त्य शिक्षण विमा योजना आणि विद्यार्थी अपघात विमा योजना लागू करण्याबाबत**

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**
शासन निर्णय क्र. टीईएम-२०११/(११/२०११)/तांशि-४,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२,
दिनांक : २५ ऑगस्ट, २०११.

संदर्भ : संचालकांचे पत्र क्र. २/एनजीसी/अशिविपॉयो/२०११/२५६२,
दिनांक १५.१.२०११ व दिनांक २० जून, २०११.

**प्रस्तावना** : नॅशनल इन्शुरन्स कंपनी (केंद्र शासनाचा अंगीकृत उपक्रम) विभागीय कार्यालय, कोल्हापूर यांचेमार्फत संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील पदविका, पदवी आणि पदव्युत्तर पदवी अभ्यासक्रमातील विद्यार्थ्यांसाठी अमर्त्य शिक्षण विमा योजना व विद्यार्थी अपघात विमा योजनेचा प्रस्ताव सादर केला आहे. सर्वसाधारणतः विद्यार्थी त्याच्या व्यावसायिक शिक्षणासाठी त्याचे पालक/त्याचा कायदेशीर पालनकर्ता यांच्यावरच आर्थिकदृष्टया अवलंबून असतो. अशा परिस्थितीमध्ये विद्यार्थ्याच्या पालकाचा अपघाती मृत्यू किंवा अपघातामुळे अपंगत्व येऊन (हात, डोळा, पाय) अवयव कायमचे निकामी झाल्यास तसेच विमाधारक विद्यार्थ्याच्या पालकाचा मृत्यू जर दवाखान्यात सर्जिकल ऑपरेशन करीत असताना किंवा ऑपरेशननंतर इस्पितळात ७ दिवसांपर्यंत मृत्यू झाला तर प्रस्तुत योजनेनुसार सदरहू विद्यार्थ्याला नुकसानभरपाई म्हणून ठोक रक्कम देण्याची तरतूद प्रस्तुत योजनेमध्ये आहे. व्यावसायिक अभ्यासक्रमानुरुप सोयीसुविधा उपलब्ध करुन देत असताना येणारा खर्च आणि त्यानुसार शिक्षण शुल्क समितीमार्फत विहित केले जाणारे शुल्क यामध्ये कालानुरुप वाढच होत आहे. सर्वसाधारण आर्थिक पार्श्वभूमी असणा-या विद्यार्थ्याचे पालक अपघातामध्ये दगावल्यास किंवा कायमस्वरुपी अपंगत्व आल्यास त्या विद्यार्थ्यास कुटुंबाचा कर्ता पुरुष गेल्याने किंवा कायमस्वरुपी अपंगत्व आल्याने होणा-या आघातामुळे व्यावसायिक शिक्षणाला वंचित रहावे लागण्याची शक्यता आहे. यावर कायमस्वरुपी व दूरगामी उपाययोजनेचा भाग म्हणून विद्यार्थ्यास अपघात विमा योजनासारख्या योजनेची आवश्यकता विचारात घेतली आहे. या पार्श्वभूमीवर तसेच वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाने ही योजना आधीच स्वीकारली असल्याने या योजनेच्या अंमलबजावणीनुसार वैद्यकीय शिक्षणाच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येणा-या योजनेचे लाभ लक्षात घेऊन तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अखत्यारीतील सर्व अभ्यासक्रमांना अमर्त्य शिक्षण विमा योजना आणि अपघात विमा योजना लागू करावयाची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय** : नॅशनल इन्शुरन्स कंपनी, विभागीय कार्यालय, कॉसमॉस कमर्शिअल कॉम्प्लेक्स, २०५ बी, 'ई', न्यू शाहूपरी, कोल्हापूर या कंपनीने संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेमार्फत सादर केलेल्या अमर्त्य शिक्षण योजना आणि अपघात विमा योजनेवरील प्रस्तावास शासनाची मान्यता देण्यात येत असून त्यानुसार तंत्रशिक्षण संचालनालयाच्या खालील अभ्यासक्रमांना शैक्षणिक वर्ष २०११-१२ पासून अमर्त्य शिक्षण विमा योजना आणि अपघात विमा योजना लागू करण्यात येत आहे.

**पदवी अभ्यासक्रम** : अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी, वास्तुशास्त्र.

**पदविका अभ्यासक्रम :** अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, हॉटेल मॅनेजमेंट ॲण्ड कॅटरिंग टेक्नॉलॉजी.

**पदव्युत्तर पदवी/ पदविका अभ्यासक्रम :** एम. ई., एम. टेक., एम. आर्च., एम. फार्म., एमबीए, एमसीए, पीजीडीएम

२. या पॉलिसी अंतर्गत संरक्षण घेण्यास तंत्रशिक्षण संचालनालयांतर्गत अभ्यासक्रमांस प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांचे आई किंवा वडील किंवा कायदेशीर पालक ज्यांचे वय २५ ते ८० वयोगटातील असतील ते पात्र असतील.

३. अमर्त्य शिक्षा विमा योजनेंतर्गत विद्यार्थ्यांचे आई किंवा वडील किंवा कायदेशीर पालक यांच्या अपघाती निधनानंतर किंवा अपघातामुळे कायमचे अपंगत्व आल्यानंतर किंवा अपघातामुळे कोणताही एक किंवा दोन अवयव (हात-पाय, डोळे) ज्यामुळे संबंधित पालक नोकरी किंवा व्यवसाय करण्यास अपात्र ठरला असेल तर शिक्षण घेणा-या पाल्याच्या शिक्षणात व्यत्यय येऊ नये म्हणून अभ्यासक्रमनिहाय पाल्यास संरक्षण देण्यात येईल.

त्याचप्रमाणे विद्यार्थी अपघाती विमा योजनेंतर्गत अभ्यासक्रमाच्या कालावधीत विद्यार्थ्यास अपघाती मृत्यू आल्यास किंवा अपघातामुळे पूर्ण अपंगत्व आल्यास विद्यार्थ्याच्या पालकास रु. १ लक्ष विमा संरक्षण प्राप्त होणार आहे. विद्यार्थ्यास ५० टक्के अपंगत्व आल्यास पाल्यास रु. ५० हजार विमा संरक्षण प्राप्त होणार आहे.

४. संरक्षणाचा कालावधी संबंधितांनी ज्या कालावधीसाठी विमा उतरविलेला आहे, त्या कालावधी इतका मर्यादित राहील.

५. सदरहू अमर्त्य शिक्षण विमा योजना आणि अपघात विमा योजनेंतर्गत विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमनिहाय, शैक्षणिक वर्षनिहाय खालीलप्रमाणे हप्ता भरावयाचा आहे.

| अभ्यासक्रमाचे शैक्षणिक वर्ष | अमर्त्य शिक्षा योजना अंतर्गत विद्यार्थ्यास मिळणारी विम्याची रक्कम | विद्यार्थी अपघात योजना अंतर्गत पालकास/विद्यार्थ्यास मिळणारी विम्याची रक्कम | विम्याची मुदत | सदर दोन्ही योजनांसाठी विद्यार्थ्यांनी अभ्यासक्रमाच्या पूर्ण कालावधीकरिता एकाच वेळी जमा करावयाची रक्कम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| प्रथम वर्ष | रु. ४.०० लाख | रु. १.०० लाख | ५ वर्षे | रु. ७७९/- |
| द्वितीय वर्ष | रु. ४.०० लाख | रु. १.०० लाख | ४ वर्षे | रु. ६५५/- |
| तृतीय वर्ष | रु. ३.०० लाख | रु. १.०० लाख | ३ वर्षे | रु. ४२४/- |
| चतुर्थ वर्ष | रु. २.०० लाख | रु. १.०० लाख | २ वर्षे | रु. २१८/- |
| पाचवे वर्ष | रु. १.०० लाख | रु. १.०० लाख | १ वर्ष | रु. ११५/- |

६. सदर हप्ता हा सर्व संबंधित शैक्षणिक संस्थांच्या प्राचार्यांनी विद्यार्थ्यांच्या प्रवेशाच्या वेळी/नवीन शैक्षणिक वर्षाच्या आरंभी विमा हप्त्याची रक्कम नॅशनल इन्शुरन्स कंपनी, विभागीय कार्यालय, कॉसमॉस कमर्शिअल कॉम्प्लेक्स, २०५बी, 'ई', न्यू शाहूपुरी, कोल्हापूर यांचेकडे विद्यार्थीनिहाय अनुषंगिक तपशिलासह एकत्रितरित्या डिमांड ड्राफ्ट/धनादेशाद्वारे उशिरात उशिरा माहे ऑक्टोबर अखेरपर्यंत सादर करावी.

७. प्रस्तुत योजनेंतर्गत विमा दाव्यासाठी खालील बाबींचा अंतर्भाव करण्यात येत आहे.

(i) शिक्षण संस्थेची फी व बोर्डींग
(ii) वसतीगृह भाडे व बोर्डींग खर्च
(iii) पुस्तके व पिरीऑडीकल खर्च
(iv) परीक्षा फी
(v) संस्थेने आयोजित केलेला उत्सव, सहली व शैक्षणिक सहली, इ. साठी सक्तीची देणगी.
(vi) युनिफॉर्म खर्च.

(vii) विभागप्रमुखाने किंवा संस्थेच्या प्रमुखाने केलेले खर्च
(viii) विमाधारक विद्यार्थ्यांच्या पालकांचे झालेल्या अपघाताचे वेळी, अपघात स्थळी अथवा घरी जाण्या-येण्याच्या द्वितीय वर्गाचे भाडे

८. वरील बाबी तसेच त्यांच्याशी अनुषंगिक कागदपत्रे विचारात घेऊन विद्यार्थ्यांचा विमा दावा प्राप्त झाल्यानंतर विमा रक्कम सदरहू विद्यार्थ्यांच्या किंवा संस्थेच्या व नॅशनल इन्शुरन्स कंपनी अशा संयुक्त (जॉईंट) नावाने राष्ट्रीयकृत बँकेत जमा केली जाईल. मात्र विद्यार्थी अपघात विमा योजनेंतर्गत प्राप्त होणारी रक्कम विद्यार्थ्यास/पालकांस कंपनीमार्फत तातडीने थेट देण्यात येईल. या योजनेमध्ये खालील बाबींचा अंतर्भाव असणार नाही.

(अ) सध्याचे अपंगत्व
(ब) आत्महत्येचा प्रयत्न, आत्महत्या किंवा जाणून-बुजून स्वतःला जखमी केल्यामुळे आलेला मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व.
(क) मादक पदार्थांचे सेवन करुन अपघात झाल्यामुळे किंवा वाईट हेतूने प्रेरित होऊन किंवा कायद्याचे उल्लंघन करताना आलेला मृत्यू किंवा कायमचे अपंगत्व.

९. प्रस्तुत योजनेंतर्गत विम्याच्या दाव्याची रक्कम प्राप्त करण्यासाठी संबंधित विद्यार्थी/पालकास खालीलप्रमाणे कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील.

(i) विमा पॉलिसी
(ii) पूर्णपणे भरलेला क्लेम फॉर्म
(iii) पोलिस पंचनामा
(iv) मृत्यू प्रमाणपत्र किंवा अपंगत्वाचे प्रमाणपत्र
(v) शवविच्छेदन प्रमाणपत्र किंवा अहवाल
(vi) कंपनीने मागितलेली इतर अनुषंगिक कागदपत्रे

१०. मात्र विमा कंपनीने आपला दावा विद्यार्थ्यांचे शैक्षणिक हित लक्षात घेऊन तातडीने (कमाल मर्यादा एक महिन्याच्या आत) निकाली काढणे आवश्यक राहील.

११. सर्व विभागीय सहसंचालक यांनी सदर योजनेची माहिती आपल्या अखत्यारीतील सर्व शैक्षणिक संस्थांना अवगत करावी.

१२. या योजनेंतर्गत विमा दाव्याच्या प्रकरणांबाबत वाद उद्‌भवल्यास तो नॅशनल इन्शुरन्स कंपनी, विभागीय कार्यालय, कोल्हापूर आणि संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांनी विद्यार्थ्यांचे/पालकांचे हित केंद्रिभूत मानून उभयपक्षी सामंजस्याने निकाली काढावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(भ. सं. वानखेडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,

१) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२) नॅशनल इन्शुरन्स कंपनी, विभागीय कार्यालय, कॉसमॉस कमर्शिअल कॉम्प्लेक्स, २०५ बी, 'ई', न्यू शाहूपरी, कोल्हापूर
३) विभागीय सहसंचालक (तंत्रशिक्षण), मुंबई / पुणे / नाशिक / औरंगाबाद / अमरावती / नागपूर /
४) निवडनस्ती/तांशि-४

C:\Documents and Settings\v\My Documents\TE ४\GR\Amartya Scheme.doc